Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# सुलीभंजन आणि परिसरातील वीट भट्ट्यांमुळे पर्यावरणावर होणारे परिणाम : एक अभ्यास

**डॉ. अशोक भालेराव**
भूगोल विभाग प्रमुख,
चिश्तिया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
खुलताबाद.

**प्रस्तावना :**

घर किंवा इमारत बांधकामासाठी विटा महत्त्वाचे साधन - साहित्य आहे. घर किंवा इमारत बांधकामासाठी तसेच इतर अनेक प्रकारच्या बांधकामासाठी विटांचा वापर केला जातो. भिंती बांधकामात विट वापरली जाते. पारंपारीक वीट म्हणजे लाल माती पासून बनवून भट्टीत भाजलेला नऊ इंच लांब, चार इंच रुंद व तीन इंच जाड मापाचा आयताकार घन ठोकळा होय. ही वीट माती,रेती, दगड, काँक्रीट,औष्णिक विद्युत केंद्रातील राख अथवा चुना यांच्यापासून बनलेली असू शकते. भाजलेल्या विटा हे पुष्कळ काळ टिकणारे मजबूत बांधकाम साहित्य आहे. त्यामुळे बांधकामांमध्ये भाजलेल्या विटांचाच वापर केला जातो. आधुनिक काळामध्ये मानवी जीवनात आमुलाग्र बदल झालेला आहे, आर्थिक सुधारणांबरोबर राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे, अनेक अविकसित व विकसनशील राष्ट्रे विकासाच्या प्रवाहामध्ये येत आहेत, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तन होत असताना साधनसंपत्तीच्या वापरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. यामध्ये वाढती लोकसंख्या व आर्थिक विकासातील वाढ या घटकांमुळे घर, इमारत उभारणीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. यासाठी विटांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

जगामध्ये वीट उत्पादनामध्ये चीन हा देश नंबर एकवर आहे. यानंतर भारताचा क्रमांक लागतो. चीन देशांमध्ये वीट उत्पादन आधुनिक पद्धतीने केले जाते. भारतात अजूनही 70% वीट उत्पादन पारंपारिक पद्धतीने, म्हणजेच हाताने होते.

वीट मानवाच्या इतिहासातील पहिले व महत्त्वाचे औद्योगिक उत्पादन आहे.भारतात वीट उत्पादनाचा फार प्राचीन इतिहास आहे.एवढा प्रदीर्घ इतिहास आणि उज्वल भविष्य असूनही परंपरागत विचारसरणी उत्पादन पद्धतीच्या विळख्यातून हा उद्योग अद्याप सुटलेला नाही. आजही वीट उत्पादन म्हटले की, मातीचे,राखेचे ढीगारे, चिखलामध्ये, धुळीमध्ये राहणारे मजूर आणि धूर ओकणाऱ्या धुमसत्या वीटभट्ट्या असेच दृश्य समोर येते.

वीटभट्टयांसाठी महाराष्ट्रातील वातावरण अत्यंत पोषक आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये वीटभट्टी उद्योग मोठ्या प्रमाणात चालतो छ.संभाजीनगर जिल्ह्यातील,खुलताबाद तालुक्यातील सुलीभंजन आणि परिसरामध्ये वीट भट्ट्यांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात स्थिरावलेला

आहे. येथील वीटभट्टी उद्योगामुळे अनेक मजुरांना रोजगार मिळालेला आहे. त्याबरोबरच मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते. मात्र वीटभट्टी व्यवसायामुळे पर्यावरणावर कोणते परिणाम होतात?,सामाजिक स्वास्थावर काय परिणाम होतात ? याचा अभ्यास सदरील लेखात करण्यात आलेला आहे.

**अभ्यासाची उद्दीष्टे :**

1) सुलीभंजन व परिसरातील स्थानिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

2) वीटभट्टी उद्योग व्यावसायाबद्दलची माहिती अभ्यासणे.

3) वीटभट्टी व्यवसायाचा परिसरातील पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**खुलताबाद ,सुलीभंजन आणि परिसर पार्श्वभूमी :**

हा प्रदेश अजिंठा - सातमाळा डोंगररांगाच्या पायथ्याशी आहे. अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय अंतर अनुक्रमे 20° 5" उत्तर व 75° 18" पूर्व असे आहे. हा परिसर सभोवतालच्या मैदानी प्रदेशापेक्षा 500 फूट उंच असून याची समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची 2732 फूट ( 832 मी.) आहे. पर्जन्यमान सर्वसाधारण असून वार्षिक सरासरी पर्जन्य 625 मी.मी. ते 741 मी.मी. च्या दरम्यान आहे. उंचीमुळे येथील हवामान तुलनेने आल्हाददायक व थंड असते. जमीन काळी व मध्यम स्वरूपाची आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून खरीप व रब्बी दोन्ही प्रकारची पिके घेतली जातात. प्रशासकीय दृष्ट्या हा अवर्षण प्रवण क्षेत्र म्हणून जाहीर आहे.

या परिसरात बागाईत जमीन कमी असून जिरायत क्षेत्र मोठे आहे. येथील डोंगर पायथा आणि डोंगरदऱ्या मध्ये कुंभारी माती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. विटा तयार करण्यासाठी अशी माती अतिशय महत्त्वाची मानली जाते.

सुलीभंजन परिसरामध्ये कामगारांची - मजुरांची वस्तीच स्थिरावलेली असून वीटभट्टीसाठी स्वस्त मजूर उपलब्ध आहेत. सुलीभंजन परिसरामध्ये 30 ते 40 वीट भट्ट्यांमधून मोठ्या प्रमाणात विटांचे उत्पादन होते. येथील विटांना तालुका परिसरातून तसेच जवळच छत्रपती संभाजीनगर असल्यामुळे विटांना मोठ्या प्रमाणात मागणी आहे. वीट भट्टी व्यावसाय येथे चांगलाच स्थिरावलेला असून या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते.

**वीट बनविण्याचे तंत्र :**

विटा बनविण्यासाठी खास अशा मातीची आवश्यकता असते. त्या मातीला "कुंभारी माती" म्हणतात. ती रेताड असली तर उत्तमच,त्यामुळे वीटभट्टी विशेष करून नदी काठावर स्थिरावलेल्या आढळतात.काही ठिकाणी ही माती डोंगर पायथा, डोंगरकडेला उपलब्ध असते. अशा मातीची उपलब्धता जेथे असेल अशा ठिकाणी वीटभट्टी व्यवसाय वाढतो. पावसाळा ऋतू संपल्यानंतर या उद्योगाला सुरुवात होते. जागेची निवड करून तेथे साफसफाई केली जाते, याला "बेना"काढणे असे म्हणतात. वीटभट्टी जवळच कुंभारी मातीचा साठा करून ठेवलेला असतो, या मातीत आवश्यकतेनुसार काही प्रमाणात राख व भुसा मिसळला जातो, त्यात पाणी सोडून पाच ते सहा तास मुरु दिले जाते, मातीत पाणी मुरल्यानंतर हा भिजलेला चिखल पायाने तुडविला जातो

याला "गारा" म्हणतात.चिखल मुलायम झाला की, या चिखलापासून विटा तयार केल्या जातात. एका विशिष्ट साच्यामध्ये याला "विटाळं" म्हणतात.त्यात चिखल टाकून विटा तयार करतात.एकावेळी एक वीट तयार होते. दिवसभरामध्ये दोन व्यक्ती साधारणतः एक हजार विटा तयार करतात, याला विटा थापणे म्हणतात. एक हजार विटा थापण्यासाठी जोडी असते, शक्यतो एक स्त्री आणि एक पुरुष दिवसभर,म्हणजे यासाठी 15 ते 16 तास द्यावे लागतात.तयार झालेल्या विटा आठ ते दहा दिवसात सुकतात, यांना कच्च्या विटा म्हणतात. वीट मालकाच्या क्षमतेप्रमाणे कच्च्या विटा भट्टीमध्ये रचून पक्की वीट तयार होते. दहा हजार पासून पाच लाखापर्यंतची वीटभट्टी असते. कच्च्या विटा सुकल्यानंतर भट्टीमध्ये शिस्तबद्ध रचल्या जातात. भट्टी शिस्तबद्ध चौफेर चिखलाने लिंपली जाते, भट्टी मोऱ्या मधून पेटवली जाते.दहा ते पंधरा दिवस विटा भट्टीमध्ये भाजल्या जातात. भट्टीच्या बाजू उलगडून भट्टी सावकाश निवू देतात. भट्टीत जळणालगतच्या थरामध्ये खंगर विटा आणि बाहेरच्या थरात भाजलेल्या विटा निघतात. अशा पद्धतीने भाजलेल्या पक्क्या विटा विक्रीसाठी तयार होतात.

**वीटभट्टीचे आर्थिक गणित :**

**माती :** वीटभट्टी उद्योगामध्ये विटा निर्मितीसाठी माती हा प्रमुख घटक आहे. खास मातीशिवाय या उद्योगाला सुरुवात होऊ शकत नाही. सुलीभंजन परिसर डोंगरदऱ्यांनी वेढलेला आहे. डोंगर पायथ्याला तसेच डोंगरदऱ्या मध्ये ही खास माती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. वीटभट्टी चालक-मालकांना या मातीची उपलब्धता दोन स्तरातून होते. शासकीय क्षेत्रातून माती मिळविण्यासाठी तहसीलमध्ये मातीची नगण्य रॉयल्टी भरून ही माती मुबलक प्रमाणात उपलब्ध होते. खाजगी क्षेत्रातून माती मिळविण्यासाठी संबंधित शेतमालकाकडून गुंठ्याप्रमाणे अथवा ब्रास प्रमाणे किंमत ठरवून माती उपलब्ध होते. एक ब्रास मातीमध्ये 1000 विटा तयार होतात, एका भट्टीमध्ये वर्षातून क्षमतेप्रमाणे लाखांमधून वीटा तयार होतात. यासाठी मोठ्या प्रमाणात माती उपलब्ध करून वापरली जाते.

**दगडी कोळसा :**

कच्च्या विटा झाल्यानंतर त्या सुकविल्या जातात. सुकलेल्या कच्च्या विटा, भट्टीमध्ये शिस्तबद्ध रुचून भाजण्यासाठी इंधन म्हणून दगडी कोळशाचा वापर केला जातो. सुलीभंजन परिसरातील वीटभट्ट्यांमध्ये इंधन म्हणून स्वस्त अशा दगडी कोळशाचा वापर केला जातो. दगडी कोळशाची राख चाळून त्यामधून निघालेले अर्धवट जळालेले कोकचे तुकडे असतात, हेच कोकचे तुकडे वीट भट्ट्यांमध्ये वापरले जातात. हा कोळसा अतिशय हलक्या दर्जाचा असतो, यातून उष्णता कमी आणि धूर जास्त निघतो, परंतु बाजारभावाप्रमाणे स्वस्तात असल्यामुळे विटा भाजण्यासाठी हाच कोळसा वापरला जातो. एका वीटभट्टी मालकाला दोन लाख वीटा भाजण्यासाठी साधारणता साठ टन दगडी कोळसा वर्षभरासाठी लागतो.याप्रमाणे सर्वसाधारण 30 ते 40 भट्टीसाठी मोठ्या प्रमाणामध्ये दगडी कोळसा वापरला जातो. अशा प्रकारे सुलीभंजन परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात दगडी कोळशाचे ज्वलन होते.

**मजूर :**

घर, इमारत बांधकामाच्या वाढत्या प्रमाणामुळे विटांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. वीटभट्टी उद्योगांमध्ये 75% वीट निर्मिती पारंपारिक पद्धतीने म्हणजेच हातानेच तयार केले जाते. यामुळे या व्यवसायामध्ये मजुरांना मोठी मागणी असते. या व्यावसायातून हजारोंना रोजगार उपलब्ध झालेला आहे. सुलीभंजन परिसरामध्ये वीटभट्टी उद्योग चांगलाच स्थिरावलेला असल्यामुळे यासाठी लागणारा मजूर वर्ग येथे कायमस्वरूपाची वस्ती करूनच स्थायिक झालेला आहे. त्यामुळे येथे मजुरांचा स्वस्तात आणि मुबलक पुरवठा झालेला आहे. वीटभट्टीवरील मजुरांचे तीन प्रकार पडतात,एक माती वाहून आणणारे , दुसरे कच्च्या विटा थापणारे, तिसरे कच्च्या विटा सुकल्यानंतर भट्टीमध्ये रचण्यासाठी लागणारे. भट्टी रचणारा कुशल मजूर असतो. विटा भाजल्यानंतर विक्रीसाठी मालवाहतूक करणारे हेच मजूर माती भरणारे असतात, हे मजूर ट्रॅक्टर, टेम्पो, ट्रकवर माती अथवा पक्का माल वाहतुकीसाठी काम करतात. विटांची थपाई करणारे मजूर शक्यतेवर भट्टी जवळच झोपड्या करून स्थायिक असतात. हे मजूर शक्यतो स्थलांतरित असतात. पावसाळ्यामध्ये वीटभट्टी मालकाकडून आगाऊ रक्कम घेऊन घरखर्च चालवतात, पावसाळा संपल्यानंतर वीटभट्टीवर कामासाठी येतात. सुलीभंजन परिसरातील भट्ट्यांवर याच स्वरूपाचे मजूर आहेत. एका भट्टीवर चार जोड्या म्हणजे आठ माणसे काम करतात. याप्रमाणे चार जोड्या माल थापायचे काम करतात. दिवसभरामध्ये एक जोडी एक हजार विटा थापतात. यासाठी 15 ते 16 तास काम चालते.1000 विटा थापण्यासाठी त्यांना नियमाप्रमाणे मोबदला मिळतो. दुसऱ्या प्रकारात विटा उचलणे, भट्टीपर्यंत रचण्यासाठी वाहतूक करणे,कोळसा फोडणे, उचल कामे करण्यासाठी सर्वसाधारण एका भट्टीवर सहा मजूर काम करतात. तिसऱ्या प्रकारात माती भरून आणणे, पक्या विटांची वाहतुकीसाठी ट्रक, टेम्पो, ट्रॅक्टरवरील मजूर असे चार मजूर कामे करतात. एकूण 18 मजूर एका भट्टीसाठी काम करतात.सुलीभंजन परिसरातील 30 ते 40 वीटभट्ट्यांवर जवळजवळ सहाशे - सातशे मजूरांना रोजगार मिळातो.

**वीटभट्टी व्यावसायामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम :**

वीटभट्टी व्यावसायामुळे घरे, इमारती बांधकामासाठी महत्त्वाचे साधन "वीट" उपलब्ध होते. विटांशिवाय घरे उभारणे जवळ जवळ अशक्यच आहे. वीट उद्योगामुळे अनेकांना रोजगार प्राप्त होतो, या उद्योगातून मोठी आर्थिक उलाढाल होते, त्यामुळे आर्थिक दृष्ट्या हा व्यवसाय अतिशय महत्त्वाचा आहे ; मात्र आपल्या देशामध्ये ज्या पद्धतीने विटांचे उत्पादन केले जाते, ती पद्धत पर्यावरणीय दृष्ट्या अतिशय हानिकारक आहे. खुलताबाद व सुलीभंजन परिसरामध्येही विटांचे उत्पादन पारंपारिक पद्धतीनेच, म्हणजेच हातांनीच केले जाते. विटा निर्मितीसाठी महत्त्वाचा घटक माती वापरली जाते. कच्च्या विटा भाजण्यासाठी दगडी कोळसा वापरला जातो. कामगार मजुरांना कोणत्याच सोयी सुविधांची उपलब्धता नसते. वीट उद्योगातून मोठी आर्थिक उलाढाल होत असली, तरी पर्यावरण दूषित होत असून अनेक पर्यावरणीय व सामाजिक समस्या निर्माण होतात .

**माती उत्खनन :**

खुताबाद व सुलीभंजन परिसरामध्ये जवळजवळ 30 ते 40 वीटभट्ट्या कार्यरत आहेत. विटा तयार करण्यासाठी येथे मातीचा वापर केला जातो. वीटांसाठी लागणारी माती सुलीभंजन परिसरातीलच डोंगर पायथा,डोंगर दऱ्या तसेच कुंभारी माती असणाऱ्या शेतातून उपलब्ध केली जाते. तसेच तलाव व नालाबल्डिंग यातील गाळ उपलब्धही वापरला जातो. दरवर्षी मोठ्या प्रमाणात विटांची निर्मिती होते. यासाठी प्रत्येक वर्षी हजारो ब्रास माती लागते आणि ही माती वरीलप्रमाणे परिसरातूनच उपलब्ध केली जाते. हा परिसर वीटभट्टी उद्योगासाठी सर्व घटकांनी अतिशय अनुकूल असल्यामुळे प्रत्येक वीटभट्टी चालक-मालक विटा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात माती उत्खनन करून,त्याचे साठे तयार करून ठेवतात. माती मिळवून हस्तगत करून,साठे करून ठेवण्यासाठी स्पर्धा चाललेली असते. माती संकलनासाठी रात्रंदिवस धावपळ चालू असते.

**मृदा उत्खननाचे पर्यावरणीय दुष्परिणाम :**

मृदा मूलभूत साधन संपत्ती आहे बहुतेक वनस्पती भूमीवरच वाढतात. मृदाभूमी जिवांचा मूलभूत आधार आहे. सागरी जीवांना ही पोषणद्रव्ये येथूनच पुरविली जातात. पर्यावरणीय दृष्ट्या मृदेला अनन्य साधारण महत्व आहे. भूपृष्ठावर मृदेचा एक सें.मी. थर निर्माण होण्यासाठी मोठा कालावधी लागतो. यावरून मृदेचे महत्त्व लक्षात येते. या मौल्यवान मृदेचे परिसरातुन बीन दिक्कत, निष्काळजीपणे अव्याहत उत्खनन सुरू आहे. या उत्खननामुळे परिसरातील शेकडो एकर जमीन उजाड - ओसाड बनली आहे. तेथील वनस्पती संपदा संपुष्टात येत आहे. जमीन बंजर झालेली आहे. पर्जन्यामुळे या जमिनीची आणखी धूप होत आहे. दिवसेंदिवस माती उत्खननाचे काम चालूच असून काही वर्षांमध्ये हा परिसर भकास होण्यास वेळ लागणार नाही. जमिनीवरील सुपीक थर नष्ट झाल्यामुळे शेती नष्ट झाली. गवत, वृक्ष संपूर्ण वृक्षाच्छान नष्ट होऊन सदरील भूभाग उजाड ओसाड झालेला आहे. येथील हिरवळ संपलेली असून परिसंस्था नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. पर्यावरणाला धोका निर्माण झालेला असून गंभीर समस्या निर्माण होत आहेत.

**दगडी कोळशाचे ज्वलन :** कच्च्या विटा भाजण्यासाठी दगडी कोळशाचा वापर केला जातो. हा दगडी कोळसा म्हणजे,दगडी कोळशाची राख चाळून त्यामधून निघालेले अर्धवट जळालेले कोकचे तुकडे असतात.हा कोळसा अत्यंत हलक्या दर्जाचा असतो. यातून उष्णता कमी आणि धूर जास्त निघतो. हा कोळसा स्वस्तात मिळतो.

हाच कोळसा वीटभट्ट्यांमध्ये विटा भाजण्यासाठी इंधन म्हणून वापरला जातो. दरवर्षी साधारणत: हजारो टन कोळसा वापरला जातो. हलक्या प्रतीच्या दगडी कोळशाच्या ज्वलनाने परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होते. हवेचे प्रदूषण दोन प्रकारे घडून येते. एक वायुरूप हवा प्रदूषक यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे इंधनाद्वारे निर्माण होणारा धूर तर दुसरा प्रकार कणरूप हवा प्रदूषके. यामध्ये धूळ, धूर, परागकण, राखीचे कण, खनिजांचे कण अशा अनेक पदार्थांचा समावेश होतो

वीटभट्ट्यांमधून दगडी कोळसा ज्वलनाने मोठ्या प्रमाणात धूर निर्माण होतो, धुळीचे व राखेचे कण निर्माण होतात. दगडी कोळशाच्या ज्वलनामुळे कार्बन मोनॉक्साईड ,कार्बन-डाय-ऑक्साइड, मिथेन, सल्फर डाय ऑक्साईड नायट्रोजन ऑक्साईड इत्यादी अपायकारक वायू परिसरातील वातावरणामध्ये मिसळले जातात. याबरोबरच धुळीचे कण, राखेचे कण, कार्बनचे कण असे प्रदूषके वातावरणात मिसळतात.

यामुळे स्थानिक वातावरणात बदल होतात.तापमानात वाढ होते. धूर, धुके निर्माण होतात.याचे मानवी आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात. श्वसनाचे गंभीर आजार होतात. पशु पक्षांच्या जीवनावर अतिशय वाईट परिणाम होतात.या प्रदुषकांची वेगवेगळ्या घटकांशी रासायनिक अभिक्रिया होऊन विषारी घटक निर्माण होतात. त्याचे मानव तसेच इतर सजीवांच्या आरोग्यवर दूरगामी आणि वाईट परिणाम होत आहेत. वनस्पती जीवनावर वाईट परिणाम होतात. त्यांची कर्बग्रहण अथवा प्रकाश संश्लेषण प्रक्रिया मंदावते, वनस्पतींची वाढ खुंटते, वृक्ष निष्पर्ण होतात,वनांचा नाश होतो, मधुमक्षिकांचे जीवन नष्ट होते, त्याचा परिणाम वनस्पती जीवनावर मोठ्या प्रमाणात होतो,पिकांचे उत्पन्न घटते, हिरवळ नष्ट होते, नैसर्गिक सौंदर्य संपून परिसर रूक्ष होतो, परिसराचे आकर्षण संपते, अवकाळा येते, वनस्पती जीवनाबरोबरच पशुपक्षीय प्राण्यांचे जीवन धोक्यात येते, त्यांचे अस्तित्व धोक्यात येते, वृक्षांची हानी झाल्यामुळे पशुपक्षी स्थलांतरित होतात, त्यांचे मृत्यूचे प्रमाण वाढते, पर्यावरण असंतुलन होऊन जीवसृष्टी धोक्यात येते. अशाप्रकारे पर्यावरणीय दुष्परीणाम आढळून येत आहेत.

**उपाय :**

सुलीभंजन आणि परिसर 50 वर्षांपूर्वी निसर्ग संपन्न असलेला परिसरात आज पर्यावरण ऱ्हासामुळे उजाड होत आहे. वीटभट्ट्यांसाठी मातीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन झाले आहे, वृक्षतोड झाली, शेती, पशुपालन प्रमुख व्यवसाय देशोधडीला लागले. हीच परिस्थिती अशीच चालू राहिल्यास काही वर्षांमध्ये खुलताबाद व सुलीभंजन आणि परिसर एका उजाड वाळवंटामध्ये रूपांतरित होण्यास वेळ लागणार नाही. याला रोखण्यासाठी काही उपायांची अंमलबजावणी आवश्यक आहे.

1) वीटभट्ट्यांसाठी लागणारी माती, परिसरातून उत्खनन करणे तात्काळ थांबवणे.
2) डोंगर पायथा, डोंगरदऱ्यातील समृद्ध माती उत्खननावर बंदी आणावी.
3) तहसील कार्यालयाने माती उत्खननासाठी रॉयल्टी घेणे बंद करावे आणि माती उत्खननावर संपूर्ण बंदी आणावी.
4) वीटभट्ट्यांना नियमावली द्यावी.
5) तलाव,धरणे, नालाबल्डींग या जलसाठ्यातील गाळ विटा निर्मितीसाठी वापरावा.
6) वीट भट्ट्यांमध्ये आधुनिक तंत्राचा वापर करावा.
7) वीट भट्ट्यातील धूर सोडण्यासाठी उंच धुराडी वापरण्याची सक्ती करावी.
8) वीट भट्ट्यांमध्ये इंधन म्हणून वापरत असलेला दगडी कोळसा उच्च प्रतीचा वापरावा.
9) वीटभट्टी चालकांच्या समस्यांचा आणि अडचणींचा शासन पातळीवर विचार व्हावा.

10) वीटभट्टी मजुरांना मूलभूत सुविधा पुरविण्यात याव्यात.
11) मुजरांसाठी वैद्यकीय सुविधांची सोय व्हावी, मजुरांची मुले शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी त्यांना तशा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
12) वीटभट्ट्या मानवी वस्तीपासून दूर चालविण्यास परवानगी द्यावी.
13) परिसरामध्ये वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात करावी. परिसराला गत वैभव प्राप्त होण्यासाठी पर्यावरणीय मूलभूत प्रयत्न व्हावेत.
14) माती उत्खननामुळे ओसाड आणि उजाड झालेले क्षेत्र विकसित करण्यासाठी धरणातील, नदी तळ्यातील गाळ टाकावा. मृद संधारणाची कामे मोठ्या प्रमाणात व्हावीत.
15) वीट भट्टी चालकांना प्रशिक्षण द्यावे. येथील पर्यावरण ऱ्हासाची शासन स्तरावर गांभीर्याने दखल घेऊन उपाययोजना कराव्यात. जनजागृती, समाज जागृतीचे कार्यक्रम घेण्यात यावेत. शाळा, महाविद्यालय, स्वयंसेवी संस्था, शासन व स्थानिक समाज, पर्यावरण तज्ञ, निसर्गप्रेमी, सुजाण व जागरूक नागरीकांचे पर्यावरण संतुलनासाठी सहकार्य घ्यावे.

**संदर्भ :**

1) पर्यावरण भूगोल - सुभाषचंद्र सारंग,विद्या प्रकाशन,नागपूर
2) पर्यावरण भूगोल - मनोज शर्मा, इशिका पब्लिशिंग हाऊस, जयपुर,भारत.
3) भारताचा भूगोल - डॉ. जयकुमार मगर, विद्या प्रकाशन, नागपूर.
4) भारत का भूगोल - सत्येंद्र अग्रवाल - इशिका पब्लिशिंग हाऊस, जयपुर, भारत.
5) महाराष्ट्राचा भूगोल - के.ए. खतीब - मेहता पब्लिशिंग हाऊस,सदाशिव पेठ, पुणे.
6) औरंगाबाद जिल्हा - विकीपिडीया
7) वीट उद्योग - मराठी विश्वकोश (विकीपिडीया).
8) तहसिल कार्यालय,खुलताबाद,जि.छ.संभाजीनगर.
9) परिसरातील प्रत्यक्ष मुलाखती,निरीक्षण व क्षेत्रभेटी.